# जिल्हाधिकारी कार्यालय लातूर
# तलाठी भरती लेखी परीक्षा-२०१४

प्र.१. 'उंबराचे फूल' या वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे?
(१) कंटाळवाणी गोष्ट (२) क्वचित भेटणारी व्यक्ती
(३) अतिशय प्रिय वस्तू (४) संकटाची चाहूल

प्र.२. खालील शब्दातील पुल्लिंगी शब्द कोणता?
(१) पान (२) तान (३) रान (४) बाण

प्र.३. 'शाळेत वेळेवर यावे' या वाक्यातील 'शाळेत' या शब्दाच्या विभक्तीचा अर्थ ओळखा.
(१) कर्ता (२) अधिकरण (३) करण (४) संबंध

प्र.४. 'तो प्रसंग अत्यंत हृदयद्रावक होता' हे वाक्य कोणत्या प्रयोगाचे आहे?
(१) भावे (२) सकर्मक कर्तरी (३) कर्मणी (४) अकर्मक कर्तरी

प्र.५. खालीलपैकी धातुसाधित विशेषण कोणते?
(१) असल्या झोपड्या (२) बोलकी बाहुली
(३) वरचा मजला (४) इतर लोक

प्र.६. खालीलपैकी विनिमयवाचक शब्दयोगी अव्यय कोणते?
(१) बरीक (२) सारखी (३) बदली (४) योगे

प्र.७. खालीलपैकी कोणता शब्द शब्दसिद्धीच्या उपसर्गघटित प्रकारात येतो?
(१) कुलीन (२) जाळपोळ (३) लिंबूटिंबू (४) भरदिवसा

प्र.८. खालील वाक्यातील शुद्ध वाक्य कोणते?
(१) सखू त्याकडे कौतुकानं पाहू लागली (२) सखू त्याच्याकडे कौतुकाने पाहू लागली.
(३) सखु त्याच्याकडे कौतुकानं पाहू लागली. (४) सखू त्याच्याकडे कौतुकानं पाहू लागली.

प्र.९. 'ढग' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?
(१) सलील (२) अंबुद (३) नभ (४) नीर

प्र.१०. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा कारकार्थ ओळखा.
बाबा कालच मुंबईहून आले.
(१) संप्रदान (२) अपादान (३) करण (४) कर्म

**प्र.११. खालीलपैकी स्वार्थी वाक्य कोणते?**

(१) सुधीर शाळेत जातो. (२) सुधीरने शाळेत जावे.

(३) सुधीर शाळेत जा. (४) सुधीरला शाळेत जाववते.

**प्र.१२. 'पांढरा परीस' या अलंकारिक शब्दाचा अर्थ काय आहे?**

(१) बावळट (२) भोळा (३) सज्जन (४) लबाड

**प्र.१३. पुढील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखा.**

**आई म्हणोनि कोणी । आईस हाक मारी**
**ती हाक येई कानी । मज होय शोककारी**
**नोहेच हाक माते । मारी कुणी कुठारी**

(१) उत्प्रेक्षा (२) उपमा (३) अपन्हुती (४) रूपक

**प्र.१४. खालीलपैकी रीतिवाचक क्रियाविशेषण कोणते?**

(१) अनकेदा (२) वारंवार (३) सांप्रत (४) जपून

**प्र.१५. 'पंचवटी' शब्दाचा समास कोणता?**

(१) कर्मधारय समास (२) द्विगू समास

(३) बहुव्रीही समास (४) विशेषण उत्तरपद समास

**प्र.१६. खालीलपैकी समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय कोणते?**

(१) शिवाय (२) परंतु (३) सबब (४) परी

**प्र.१७. खालीलपैकी संबोधनदर्शक केवलप्रयोगी अव्यय कोणते?**

(१) वा (२) छान (३) अरे (४) ओ

**प्र.१८. पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा:**

**'स्नेहाने सचिनला मारले.'**

(१) कर्तरी प्रयोग (२) भावे प्रयोग

(३) कर्मणी प्रयोग (४) सकर्मक कर्तरी प्रयोग

**प्र.१९. खालीलपैकी धातुसाधित क्रियाविशेषण अव्यय कोणते आहे?**

(१) अर्थात (२) एकदा (३) हसून (४) खालून

**प्र.२०. 'मन्वंतर' हा शब्द खालीलपैकी कोणत्या दोन शब्दांच्या संधीतून तयार होतो?**

(१) मनुव + अंतर (२) अनु + अवांतर (३) मन्व + अंतर (४) मनु + अंतर

**प्र.२१. खालील शब्दसमूहातील समानार्थी नसलेला शब्द कोणता?**

**हय, तुरग, वाजी, वारू, व्याल.**

(१) व्याल (२) वारू (३) हय (४) तुरग

प्र.२२. 'लघू' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?
(१) ऱ्हस्व (२) दीर्घ (३) गुरू (४) मध्यम

प्र.२३. 'सनातनी' या शब्दाचा अर्थ कोणता आहे?
(१) सत्याचा आग्रह धरणारा
(२) जुन्या रूढींचेच पालन करणारा
(३) मूर्तींची पूजा करणारा
(४) श्रद्धा ठेवून वागणारा

प्र.२४. खालीलपैकी योग्य जोडी कोणती?
(१) प्रथमा - स, ला, ते - स, ला, ना, ते
(२) द्वितीया - ने, ए, शी - नी, ही, ई, शी
(३) तृतीया - नो
(४) पंचमी - ऊन, हून - ऊन, हून

प्र.२५. दिलेल्या वाक्याचा प्रयोग ओळखा आणि तोच प्रयोग असणारे वाक्य पर्यायांतून निवडा.
'सीताचे पुस्तक हरवले.'
(१) सीताने पुस्तक हरवले.
(२) राजूच्या कानात मुंगी शिरली.
(३) कमला पुस्तक वाचते.
(४) समीर बैलास बांधतो.

प्र.२६. **Fill in the blanks with appropriate article. Cloth is sold by ...... metre.**
(१) a
(२) an
(३) the
(४) None of the above.

प्र.२७. **Fill in the blanks with appropriate word. Both ...... brothers live together.**
(१) of (२) the (३) a (४) an

प्र.२८. **Fill in the blanks with correct verb.**
**Food prices ...... a new high.**
(१) thouch (२) thouches (३) been touched (४) had touching

प्र.२९. **Choose the correct sentence of the following.**
(१) I shall be so busy tomorrow that I shall not be able to receive any visitors.
(२) I will be so busy tomorrow that I would not be able to receive any visitors.
(३) I shall be so busy tomorrow that I could not be able to receive any visitors.
(४) None of the above.

प्र.३०. **Rewrite the following sentences in the Assertive -**
**Who was there to listen to her appeals?**
(१) There is any one to listen to her appeals.
(२) There was no any one to listen to her appeals.
(३) No one could listen to her appeals.
(४) There was none to listen to her appeals.

**प्र.३१. Transform the following simple sentence into complex sentence -**

**It all ended according to my expectations.**

(१) It all ended as I had expected.

(२) It all ended as I have expected.

(३) It all was ended as I expected.

(४) I expected that it should ended as my expectation.

**प्र.३२. Put the following sentences into indirect speech.**

**My sister said to me, You look hungry: Shall I go and bring you some fruit?**

(१) My sister told me about my hunger and she wanted to go and bring me some fruits.

(२) My sister told me that I looked hungry. She offered to go and bring me some fruit.

(३) My sister told me that I looked hungry and she wanted to went and brought me some fruit.

(४) My sister asked that I had looked hungry and she offered to go and bring me some fruit.

**प्र.३३. Make it singuler noun : draughts**

(१) draughte (२) draughts (३) draughtes (४) draughtees

**प्र.३४. Choose the correct sentence.**

(१) I have lost a ten rupees note. (२) I have lost a note of rupees ten

(३) I have losted a ten rupees note (४) I have lost a ten-rupee note.

**प्र.३५. Choose the correct sentence.**

(१) The climate of Mumbai is more pleasant than Delhi.

(२) The climate of Mumbai is as more pleasant than of Delhi.

(३) The climate of Mumbai is more pleasant than that of Delhi.

(४) The climate of Mumbai is more than pleasant as of Delhi.

**प्र.३६. Suggest synonym for the following word : incessant.**

(१) angry (२) continuous (३) insane (४) cleaver

**प्र.३७. Suggest antonym for the following word : wearisome**

(१) refreshing (२) bored (३) refined (४) unwearable

**प्र.३८. Write the correct meaning of the word: conceal.**

(१) camouflage (२) camoflage (३) comoflague (४) camoflag

प्र.३९. **Make noun from the following word : Admit.**

(१) Admittance (२) Admission (३) Admitance (४) Admittable

प्र.४०. **Make adjective from the following word : sight.**

(१) visible (२) sightable (३) sightful (४) vigilant

प्र.४१. **Give meaning of the following phrase. de novo**

(१) old (२) fancy (३) novel (४) a new

प्र.४२. **Choose the correct alternatives from those given below:**

**It has been raining for the past five days I wish it ......**

(१) would stop raining. (२) stopped to rain.

(३) stopped raining. (४) were to stop raining.

प्र.४३. **Fill in the blanks with appropriate word.**

**It has to be seen ......**

(१) to been belived (२) to being believed

(३) to be believed (४) to belive

प्र.४४. **How many friends helped you? In passive voice, this sentence will be written as -**

(१) You were helped by how many friends?

(२) Were you helped by how many friends?

(३) How many friends were you helped by?

(४) How many friends you were helped?

**Choose the part in which you find an error. If there is no error, then choose option (4) :-**

प्र.४५. **Until / you remain restless / you cannot concentrate / No error**

(१) A (२) B (३) C (४) D

प्र.४६. **The colour of her cheeks / is / like a rose / No error**

(१) A (२) B (३) C (४) D

**Choose the expression that explains the given word correctly:**

प्र.४७. **Explicit :**

(१) Trade prohibited by law.

(२) Drawing out a secret from somebody.

(३) Statement that is absolutely clear.

(४) Comparison that is out of place.

प्र.४८. **Curator :**

(१) One who cures diseases.

(२) One who is officially in charge of a museum or art gallery.

(३) One who makes and repairs knives and other cutting tools.

(४) One who sells soaps, oils, candles etc.

प्र.४९. **Choose the correct word for the following.**

**A person who is womanish in his habits.**

(१) Feminist (२) Effeminate (३) Philanderer (४) Philogynist

प्र.५०. **Complete the following idioms with appropriate word given below.**

**Flog a dead ...... .**

(१) dog (२) cat (३) mouse (४) horse

प्र.५१. **लातूर जिल्ह्यातील खालीलपैकी कोणत्या तालुक्यातील वळू भारतात प्रसिद्ध आहेत?**

(१) उदगीर (२) देवणी (३) चाकूर (४) निलंगा

प्र.५२. **एकदिवसीय क्रिकेट (one day) सामन्यामध्ये सर्वात जलद शतकाचा विक्रम कोणाच्या नावावर आहे?**

(१) शाहीद आफ्रिदी (२) कोरी अँडरसन (३) विराट कोहली (४) ख्रिस गेल

प्र.५३. **खालीलपैकी कोणत्या राज्यात पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात नाही?**

(१) नागालँड (२) कर्नाटक (३) केरळ (४) पश्चिम बंगाल

प्र.५४. **'राणीखेत' हे थंड हवेचे ठिकाण खालीलपैकी कोणत्या भागात आहे?**

(१) कुमाऊ-गढवाल (२) रायलसीमा

(३) अरवली पर्वत (४) निलगिरी पर्वत

प्र.५५. **आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) वर्ष २०१५ मधील एकदिवसीय सामन्यातील सर्वश्रेष्ठ खेळाडू म्हणून कोणाची निवड केली आहे?**

(१) विराट कोहली (२) ए. बी. डिव्हिलर्स (३) शिखर धवन (४) मायकेल क्लार्क

प्र.५६. **'अनब्रेकेबल' हे आत्मचरित्र कोणी लिहिले आहे?**

(१) लिएंडर पेस (२) धनराज पिल्ले (३) मेरी कोम (४) मिल्खा सिंग

प्र.५७. **लातूर जिल्ह्यातील वडवळ बेट कशासाठी प्रसिद्ध आहे?**

(१) सैन्य प्रशिक्षण केंद्र (२) औषधी वनस्पती

(३) कागद कारखाना (४) साई नंदनवनं

प्र.५८. **नीलक्रांती (Blue Revolution) खालीलपैकी कशाशी संबंधित आहे?**

(१) शेती (२) दुग्धोत्पादन (३) मत्स्योत्पादन (४) जलसिंचन

**प्र.५९. भारतातील पहिली जनगणना ...... या वर्षी करण्यात आली होती.**

(१) १८५२ (२) १८६१ (३) १८७२ (४) १८८१

**प्र.६०. एखादी व्यक्ती भारताचे राष्ट्रपतिपद किती वेळा भूषवू शकते?**

(१) फक्त दोन वेळा (२) फक्त तीन वेळा (३) फक्त एक वेळा (४) कितीही वेळा

**प्र.६१. जागतिक बुद्धिबळ स्पर्धा २०१५ चा विजेता कोण?**

(१) गॅरी कॉस्पारॉव्ह (२) विश्वनाथन आनंद (३) मॅग्नस कार्लसन (४) ज्युडीथ पोल्गर

**प्र.६२. ग्रामपंचायत सदस्यास राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यास तो...... यांचेकडे सादर करावा लागतो.**

(१) गटविकास अधिकारी (२) सरपंच

(३) तहसीलदार (४) मुख्य कार्यकारी अधिकारी

**प्र.६३. ......या स्वदेशी निर्मित हलक्या लढाऊ विमानांचा भारतीय वायुसेनेत समावेश करण्यात आला?**

(१) पवनहंस (२) चेतक (३) तेजस (४) चिता

**प्र.६४. ...... हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे महत्त्वाचे अन्नधान्य पीक होय.**

(१) भात (२) गहू (३) ज्वारी (४) ऊस

**प्र.६५. महाराष्ट्राला किती कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे?**

(१) ८०० (२) ७२० (३) ६५० (४) १२००

**प्र.६६. सध्या राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा कोण आहेत?**

(१) कृष्णा तीरथ (२) ललिता कुमारमंगलम् (३) नंदिता दास (४) अमृता पटेल

**प्र.६७. किण्वपेशी कोणत्या गटातील वनस्पती आहे?**

(१) जिवाणू (२) विषाणू (३) शैवाल (४) कवक

**प्र.६८. विधानपरिषदेच्या एकूण सदस्यांपैकी ...... सदस्यांची नेमणूक राज्यपालांकडून केली जाते.**

(१) दहा (२) सहा (३) एक-बारांश (४) एक-षष्ठांश

**प्र.६९. 'दांडेकर समिती' कोणत्या विषयाशी संबंधित होती?**

(१) शेती सुधारणा (२) प्रादेशिक असमतोल

(३) नवीन शैक्षणिक धोरण (४) वृत्तपत्र स्वातंत्र्य

**प्र.७०. भारतरत्न सन्मानाचे पहिले बिगर-भारतीय मानकरी ...... होत.**

(१) नेल्सन मंडेला (२) खान अब्दुल गफारखान

(३) मदर तेरेसा (४) मिखाईल गोर्बाचेव्ह

**प्र.७१. सध्याचे भारताचे मुख्य माहिती आयुक्त...... आहेत.**

(१) वजाहत हबीबउल्लाह (२) राजीव माथूर

(३) रंजन मथाई (४) सुमित बोस

**प्र.७२. प्रसिद्ध हॉर्नबिल महोत्सव ...... राज्यात साजरा केला जातो.**

(१) मणिपूर (२) नागालँड (३) मेघालय (४) मिझोराम

**प्र.७३. स्वयंपाकाचा गॅस हा ...... चे संमिश्र असते.**

(१) ब्युटेन व प्रोपेन (२) इथिलिन व प्रोपेन

(३) मिथेन व हेलियम (४) हायड्रोजन व मिथेन

**प्र.७४. २०१४ ऑस्ट्रोलियन ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद कोणी जिंकले?**

(१) मारिया शारापोव्हा (२) व्हिनस विल्यमस्

(३) व्हिक्टोरिया अझारेंका (४) ली ना

**प्र.७५. राष्ट्रीय मतदार दिवस ...... या दिवशी साजरा केला जातो.**

(१) २५ डिसेंबर (२) २८ फेब्रुवारी (३) २५ जानेवारी (४) १४ फेब्रुवारी

**प्र.७६. जिलेबीला लाडू, लाडूला बासुंदी, बासुंदीला बर्फी म्हटले, तर पुरी कशाबरोबर खाल?**

(१) बर्फी (२) लाडू (३) जिलेबी (४) बासुंदी

**प्र.७७. एका सांकेतिक भाषेत ३४२ ही संख्या ५७६ अशी लिहितात, तर १५४ ही संख्या कशी लिहावी?**

(१) ३८५ (२) ३८८ (३) ३२८ (४) ३६६

**प्र.७८. एका वर्गातील ५० विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थ्यांचे सरासरी वय १२ वर्ष आहे. २० विद्यार्थ्यांचे सरासरी वय १२.५ वर्षे आणि राहिलेल्या विद्यार्थ्यांचे सरासरी वय १४ वर्षे आहे, तर वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे सरासरी वय किती?**

(१) १३ वर्षे (२) १३.५ वर्षे (३) १३.७५ वर्षे (४) १३.२५ वर्षे

**प्र.७९. एका सांकेतिक भाषेत 573 चा अर्थ bring cold water असा होतो. 342 चा अर्थ water is good असा होतो व bright good boy यासाठी 126 असा संकेत वापरतात, तर boy is bright साठी खालीलपैकी कोणते संकेत येतील?**

(१) 671 (२) 574 (३) 641 (४) 673

**प्र.८०. ३, १०, २९, ६६, ......?**

(१) १२५ (२) १२६ (३) १२७ (४) १३६

**प्र.८१. 'अ' चे वय 'ब' च्या वयापेक्षा तिप्पट आहे. चार वर्षांपूर्वी 'क' चे वय, 'अ' च्या तेव्हाच्या वयाच्या दुप्पट होते. जर चार वर्षांनंतर 'अ' चे वय ३१ वर्ष असेल, तर 'ब' व 'क' चे आजचे वय किती?**

(१) १०, ५० (२) १०, ४६ (३) ९, ५० (४) ९, ४६

**प्र.८२. शीर्षासन केलेल्या अवस्थेत रामरावचा उजवा हात जर पूर्व दिशा दाखवित असेल, तर त्याचा चेहरा कोणत्या दिशेस आहे?**

(१) उत्तर (२) पश्चिम (३) पूर्व (४) दक्षिण

प्र.८३. मला १९ मीटर दोरखंडाचे एकेक मीटर लांबीचे तुकडे कापून तयार करावयाचे आहेत. प्रथम मी त्या दोरखंडाची दोन्ही टोके जुळवून घेतली तर, मला हवे असलेले त्या दोरखंडाचे तुकडे मिळविण्यास कमीत कमी किती वेळा कापावे लागेल?

(१) १८ (२) ९ (३) १० (४) १९

प्र.८४. समजा प्रत्येक मूर्तीला फुले अर्पण करण्यापूर्वी अनिलच्या हातात असलेली फुले प्रत्येक वेळी दुप्पट होतात. अनिलने मंदिरातील तीन मूर्तींना समान फुले अर्पण केली. तिसऱ्या मूर्तीला फुले अर्पण केल्यानंतर जर अनिलच्या हातात एकही फूल शिल्लक राहिले नसेल, तर सुरुवातीला अनिलच्या हातात कमीत कमी किती फुले होती?

(१) ७ (२) ६ (३) ८ (४) १०

प्र.८५. मुंबईहून नागपूरला जाणाऱ्या दोन गाड्यांपैकी ताशी ६० कि.मी. वेगाने जाणारी पहिली गाडी सकाळी ७.३० वाजता सुटली. त्यानंतर त्याच दिवशी त्याच मार्गाने दुसरी गाडी ताशी ७५ कि.मी. वेगाने सकाळी ८.३० वाजता सुटली, तर त्या एकमेकास किती वाजता भेटतील.

(१) दु. १२ वा (२) १.३० वा (३) १२.३० वा (४) ११.३० वा

प्र.८६. एका वृत्तचितीच्या आकाराच्या धान्य साठविण्याच्या कणगीच्या त्रिज्या १.५ मीटर व उंची २.१ मीटर आहे. एका पोत्यात ०.४५ घनमीटर धान्य मावते, तर अशी किती पोती धान्य त्या कणगीत साठविता येईल?

(१) २२ (२) ३३० (३) २१ (४) ३३

प्र.८७. एका ट्रकच्या पुढील चाकाचा व्यास ५६ से.मी. असल्यास २.६४ कि.मी. अंतरामध्ये त्या चाकाचे किती फेरे होतील?

(१) २००० (२) २०० (३) १५०० (४) ४०००

प्र.८८. रेल्वे तिकिटांचे मूळ दर शेकडा १५ ने वाढविले. पुन्हा काही महिन्यानंतर शेकडा १० ने वाढविले, तर मूळ भाड्यात शेकडा किती वाढ झाली?

(१) २६% (२) २६.५% (३) २०% (४) २३%

प्र.८९. ७५८२३७ सेंटीग्रॅम = ...... हेक्टोग्रॅम.

(१) ७५.८२३७ (२) ७५८.२३७ (३) ७.५८२३७ (४) ७५८२.३७

प्र.९०. जर $\frac{H}{S} = 1, \frac{W}{A} = 4, \frac{M}{S} = \frac{13}{8}, \frac{E}{O} = 60$, तर $\frac{EFG}{WVU} = ?$

(१) 1.60 (२) 1.90 (३) 1.75 (४) 1.80

प्र.९१. M_NMMN_MMN_MMN,_M.

(१) MMNM (२) MMMM (३) MMMN (४) NNNN

प्र.९२. शेजारच्या माणसाचा परिचय करून देताना एक स्त्री म्हणाली, त्याची बायको माझ्या आईची एकुलती एक मुलगी आहे, तर स्त्रीचे त्या माणसाशी नाते काय?

(१) मेहुणा (२) पत्नी (३) आत्या (४) काकू

**प्र.९३. जर ०५ फेब्रुवारी २०१३ या दिवशी बुधवार असेल, तर ९ ऑगस्ट २०१३ दिवशी कोणता वार असेल?**

(१) रविवार (२) शनिवार (३) गुरुवार (४) शुक्रवार

**प्र.९४. एका रस्त्यावरून काही घोडे व तेवढेच घोडेस्वारही चालत चाललेले आहेत. काही अंतर कापल्यानंतर त्यापैकी निम्मे घोडेस्वार घोड्यावर स्वार झाले. आता चालणाऱ्या पायांची संख्या ५० झाली, तर एकूण घोडे किती?**

(१) ५ (२) ३० (३) १० (४) २०

**प्र.९५. चंद्रवर्ष : पंचांग :: सौरवर्ष : ?**

(१) ग्रहण (२) कॅलेंडर (३) दिनविशेष (४) डायरी

**प्र.९६. स्नेहाचे वय तिच्या आईच्या वयाच्या $\frac{१}{२}$ पेक्षा ५ ने कमी आहे व तिच्या मावशीच्या वयाच्या $\frac{१}{३}$ आहे. स्नेहाच्या आईचे वय ४० वर्ष असल्यास, स्नेहाच्या मावशीचे वय किती?**

(१) ४५ वर्षे (२) ४८ वर्षे (३) ४० वर्षे (४) ५० वर्षे

**प्र.९७. एका सुसम बहुभुजाकृतीला १२ बाजू आहेत, तर तिचा प्रत्येक आंतरकोन किती अंशाचा असेल?**

(१) १६०° (२) १५०° (३) १४५° (४) १३५°

**प्र.९८. एका सांकेतिक भाषेत जर SLVPLYOB हा शब्द POSSIBLE असा लिहिला, तर त्या सांकेतिक भाषेत IOHBCB हा शब्द कसा लिहिला जाईल?**

(१) FREEZE (२) FREZEE (३) FREZZE (४) FRZEF

**प्र.९९. जर A=2, B=4, C=6, D=8 व या प्रमाणे तर त्यांचा वापर करून NATIONAL हा शब्द कसा लिहाल?**

(१) 28-2-38-18-30-26-2-24 (२) 28-2-38-16-30-28-2-24

(३) 28-2-40-18-30-26-2-24 (४) 28-2-40-14-30-28-2-24

**प्र.१००. खालील प्रश्नात दिलेल्या विशिष्ट गटातील शब्दांचा योग्य क्रम लावल्यास मधोमध कोणता शब्द येईल? डेकामीटर, डेसिमीटर, हेक्टोमीटर, मीटर, किलोमीटर.**

(१) हेक्टोमीटर (२) डेसीमीटर (३) मीटर (४) डेकामीटर

## प्रश्नपत्रिका संग्रह – २७ (लेखी परीक्षा उत्तरसूची) लातूर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (२) | २ (४) | ३ (२) | ४ (४) | ५ (२) | ६ (३) | ७ (४) | ८ (१) | ९ (२) | १० (२) |
| ११ (१) | १२ (४) | १३ (३) | १४ (४) | १५ (२) | १६ (१) | १७ (३) | १८ (२) | १९ (३) | २० (४) |
| २१ (१) | २२ (३) | २३ (२) | २४ (४) | २५ (२) | २६ (३) | २७ (२) | २८ (१) | २९ (१) | ३० (४) |
| ३१ (१) | ३२ (२) | ३३ (२) | ३४ (४) | ३५ (३) | ३६ (२) | ३७ (१) | ३८ (१) | ३९ (२) | ४० (१) |
| ४१ (४) | ४२ (३) | ४३ (३) | ४४ (३) | ४५ (१) | ४६ (३) | ४७ (३) | ४८ (२) | ४९ (२) | ५० (२) |
| ५१ (२) | ५२ (२) | ५३ (१) | ५४ (१) | ५५ (२) | ५६ (३) | ५७ (२) | ५८ (३) | ५९ (३) | ६० (४) |
| ६१ (३) | ६२ (२) | ६३ (३) | ६४ (२) | ६५ (२) | ६६ (२) | ६७ (४) | ६८ (४) | ६९ (२) | ७० (२) |
| ७१ (२) | ७२ (२) | ७३ (१) | ७४ (४) | ७५ (३) | ७६ (१) | ७७ (२) | ७८ (१) | ७९ (३) | ८० (३) |
| ८१ (३) | ८२ (४) | ८३ (२) | ८४ (१) | ८५ (३) | ८६ (४) | ८७ (३) | ८८ (२) | ८९ (१) | ९० (३) |
| ९१ (४) | ९२ (२) | ९३ (२) | ९४ (३) | ९५ (२) | ९६ (१) | ९७ (२) | ९८ (१) | ९९ (४) | १०० (४) |